प्रेसनोट दि ०१/०८/२०१७

## पुणे स्टेशन परिसरात जबरी चोरीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांना गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाकडुन अटक .

बंडगार्डन पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर २५७/२०१७ भादवि कलम ३९२, ३४ या गुन्हातील आरोपींचा शोध चालु असताना, दरोडा प्रतिबंधक पथकाकडील पोहवा १३४५ पाटील व पोना ६४४२ स्वामी यांना बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हा इसम नामे साई कलाल, रा. नाना पेठ, पुणे व त्याचा साथीदार रोहीत पवार यांनी केलेला आहे. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि लक्ष्मण ढेंगळे व अधिनस्त कर्मचारी यांनी दिनांक ३०/०७/२०१७ रोजी १९/१० वा. बाटलीवाला गार्डन वडापावचे गाडी जवळ, कॅम्प, पुणे येथे इसम नामे १) साई रमेश कलाल, वय १९ वर्षे, धंदा गॅरेज, रा. ३८१, नाना पेठ, बडदे गॅरेज, पुणे व २) रोहीत राजु पवार, वय १८ वर्षे, रा. गवळी वाडा कॅम्प पुणे या दोघांना एक्सेस गाडी क्र एमएच/१२/जीएल/६४८० सह ताब्यात घेवुन त्यांचे कडुन दाखल गुन्हयातील विविध कंपनीचे ३ मोबाईल फोन कि.रु.४००००/- व गुन्हा करणे करीता वापरलेली एक्सेस गाडी असा सर्व मिळुन कि.रु. ९०,०००/- चा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री प्रदिप देशपांडे, मा. पोलीस उप आयुक्त श्री.पंकज डहाणे, सपोआ गुन्हे-१, श्री सुरेश भोसले यांचे सूचनेप्रमाणे गुन्हे शाखेचे दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम,सपोनि लक्ष्मण ढेंगळे, पोलीस कर्मचारी विनायक पवार, निलेश पाटील, बशीर सय्यद, मल्लिकार्जुन स्वामी, महेश कदम,रामभाऊ गोणते, सचिन गायकवाड, यांनी केली आहे.